15 JAN 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिक घडविणे गरजेचे


## ऑस्ट्रेलियातील इन्स्टिट्यूटचे व्हा. प्रेसिडेंट डॉ. अरुण पाटील यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांना पदवीच्या पलिकडे भावनिकदृष्ट्या सजग आणि नैतिकदृष्ट्या जबाबदार नागरिक करणे ही आजच्या 'ग्लोबल' काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे व्हाईस प्रेसिडेंट डॉ. अरुण पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषद सदस्यांसाठी डॉ. पाटील यांचे 'करिक्युलम एनरिचमेंट' या विषयावरील आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पाटील म्हणाले, भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची सर्वदूर चर्चा आहे. कालसुसंगत अभ्यासक्रमांची निर्मिती, विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्य प्रदान, त्यामधून रोजगाराभिमुख पिढीची निर्मिती आणि अशा पिढीचा राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सकारात्मक सहभाग ही उद्दिष्ट्ये त्यामागे आहेत. जगभरातील विद्यापीठांनी अशा प्रकारचे शैक्षणिक धोरण खूप आधीपासूनच स्वीकारले आहे. शिक्षकांना काय शिकवायचे आहे, यापेक्षा विद्यार्थ्यांना काय शिकायचे आहे, त्यांच्या शैक्षणिक, संशोधकीय गरजा काय आहेत. हे पाहणे गरजेचे आहे,असे ते म्हणाले.




**कोल्हापूर : व्याख्यानात मार्गदर्शन करताना ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे व्हाईस प्रेसिडेंट डॉ. अरुण पाटील. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय विद्यापीठांनी आपल्या वाटचालीची दिशा काय ठेवली पाहिजे, या दृष्टीने डॉ. पाटील यांनी केलेले मार्गदर्शन मौलिक स्वरुपाचे ठरणारे आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांना आपापल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळे विभागाने उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन केले.

15 JAN 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक घडविणे 'ग्लोबल' काळाची गरज

## डॉ. अरुण पाटील : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १४ : 'विद्यार्थ्यांना पदवीच्या पलीकडे भावनिकदृष्ट्या सजग आणि नैतिकदृष्ट्या जबाबदार नागरिक बनविणे ही आजच्या 'ग्लोबल' काळाची गरज आहे', असे प्रतिपादन ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे व्हाईस प्रेसिडेंट डॉ. अरुण पाटील यांनी गुरुवारी केले.



कोल्हापूर : डॉ. अरुण पाटील यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषद सदस्यांसाठी डॉ. पाटील यांचे 'करिक्युलम एनरिचमेंट' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, 'भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची सर्वदूर चर्चा आहे. कालसुसंगत अभ्यासक्रमांची निर्मिती, विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्य प्रदान, त्यामधून रोजगाराभिमुख पिढीची निर्मिती आणि अशा पिढीचा राष्ट्रनिर्माणच्या कार्यात



सकारात्मक सहभाग ही उद्दिष्टे त्यामागे आहेत. जगभरातील विद्यापीठांनी अशा प्रकारचे शैक्षणिक धोरण खूप आधीपासूनच स्वीकारले आहे. शिक्षकांना काय शिकवायचे आहे, यापेक्षा विद्यार्थ्यांना काय शिकायचे आहे, त्यांच्या शैक्षणिक, संशोधकीय गरजा काय आहेत आणि त्या कशा भागविता येतील, या दिशेने या समग्र शिक्षणाची दिशा केंद्रित झाली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्था जितक्या लवकर अशा प्रकारचा दृष्टिकोन अंगीकृत करेल, तितके ते हिताचे आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ विभागाचे उपकुलसचिव डॉ. संजय कुबल यांनी व्याख्यानाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2025

तरुण भारत



अतिग्रे, : येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्कार स्वीकारताना 'तरुण भारत संवाद'चे बातमीदार अशोक पाटील.

# आदर्श समाज निर्मितीसाठी आव्हाने स्वीकारून प्रयत्न करा : कुलगुरू शिर्के

**कौलव :** पत्रकारितेमध्ये भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्यकाळाविषयी दिशादर्शन करणे व त्यात तुमचे योगदान देणे महत्त्वाचे असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. अतिग्रे येथे झालेल्या या कार्यक्रमात घोडावत इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विराट गिरींची प्रमुख उपस्थिती होती. हातकणंगले तालुक्यातील अतिग्रे येथील संजय घोडावत विद्यापीठात कार्यक्रम झाला. यावेळी अशोक पाटील यांना उत्कृष्ट जिल्हा पत्रकार पुरस्कार देण्यात आला. प्रा. रवींद्र पाटील यांनी स्वागत केले. सुधाकर निर्मळे यांनी प्रास्ताविक केले. सुरेश पाटील यांनी अहवाल वाचन केले. पुनम चौगुले, अतुल मंडपे यांनी सूत्रसंचालन केले. अभिजीत कुलकर्णी यांनी आभार मानले.

15 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी होणार आहे. त्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे.
(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2025
तरूण भारत

# संत तुकारामांच्या निवडक अभंगांना उद्या स्वरसाज

- विद्यापीठात गायिका साधना शिलेदार यांचे गायन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्राची वारकरी परंपरा आपल्या बहुप्रसवी वाणीने समृद्ध करणारे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या काही निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी १६ रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनात होणार आहे.



विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त १६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात या विशेष चित्रफीत–ध्वनीमुद्रणाचे प्रकाशन आणि गायिका डॉ. साधना शिलेदार यांचे गायनही आयोजित केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, संत तुकाराम यांच्या अनेक अभंगरचनांवर अनेक नामवंत गायक–गायिकांनी स्वरसाज चढविला आहे. त्या मोठ्या प्रमाणात लोकप्रियही आहेत. दहा निवडक अभंग रचना स्वरबद्ध करण्याचे काम अध्यासनामार्फत करण्यात आले. सुप्रसिद्ध गायिका डॉ. साधना शिलेदार यांनी त्यांचे गायन केले आहे. त्याचप्रमाणे या रचना त्यांच्यासह श्रीकांत पिसे, राहुल एकबोटे, संकेत नागपूरकर, दीपश्री पाटील या संगीतकारांनी संगीतबद्ध केल्या आहेत. सकाळी ११ वाजता संत डॉ. साधना शिलेदार यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. निवेदक म्हणून सांगोल्याचे ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर उपस्थित राहणार आहेत.

रसिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत तुकाराम यांच्या अभंगांच्या नवरचनांचा आस्वाद घ्यावा,असे आवाहन डॉ. मोरे यांच्यासह डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

15 JAN 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त सोहळ्यात डॉ. साधना शिलेदार यांचे गायन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची वारकरी परंपरा आपल्या बहुप्रसवी वाणीने समृद्ध करणारे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या काही निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने बजावली आहे. विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त दि. १६ जानेवारीला सकाळी ११ वाजता आयोजित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात या विशेष चित्रफीत-ध्वनिमुद्रणाचे प्रकाशन आणि सुप्रसिद्ध गायिका डॉ.



साधना शिलेदार यांचे गायनही आयोजित केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी या संदर्भात दिलेल्या माहितीनुसार, संत तुकाराम यांच्या अनेक अभंगरचनांवर अनेक नामवंत गायक-गायिकांनी स्वरसाज चढवला आहे. मात्र, त्याचवेळी तुकाराम महाराजांच्या अनेक रचनांवर अद्याप सांगितिक स्वरसाज चढवण्यात आलेला नाही. अशा दहा निवडक अभंग रचना स्वरबद्ध करण्याचे काम अध्यासनामार्फत करण्यात आले. सुप्रसिद्ध गायिका डॉ. साधना शिलेदार यांनी त्यांचे गायन केले आहे. त्याचप्रमाणे या रचना त्यांच्यासह श्रीकांत पिसे, राहुल एकबोटे, संकेत नागपूरकर, दीपश्री पाटील या संगीतकारांनी संगीतबद्ध केल्या आहेत. 'तुकोबांची अभंगवाणी' या नावाने असलेल्या या चित्रफीत व ध्वनी मुद्रणाचे प्रकाशन येत्या १६ जानेवारी रोजी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून १६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता संत तुकाराम अध्यासन आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित या कार्यक्रमामध्ये डॉ. साधना शिलेदार यांचा विशेष गायन कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमास निवेदक म्हणून सांगोल्याचे ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

15 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना थेट मोबाईलवर 'डिग्री'

## विद्यापीठाकडून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर : वेळ, श्रमाची होणार बचत

### दीक्षान्त समारंभ विशेष

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १४ : पहिल्यांदा अर्ज, त्यानंतर शुल्क आणि त्या पाठोपाठ तक्रार निवारणाची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देत शिवाजी विद्यापीठ अगदी थेट विद्यार्थ्यांना त्यांच्या हातातील मोबाईलच्या माध्यमातून पदवी प्रमाणपत्र (डिग्री) देत आहे. विद्यापीठाच्या या सकारात्मक पावलाने विद्यार्थी, प्रशासनाचा वेळ, श्रम आणि खर्चाची बचत झाली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिग्री मिळविण्याची प्रक्रिया सोयीस्कर बनली आहे.**

सहा वर्षांपूर्वी विद्यापीठाच्या अनेक बिल्डिंगमधून हातांत अर्ज घेऊन त्याला गुणपत्रिका, छायाचित्र, आदी कागदपत्रे जोडून मुख्य इमारतीमधील शुल्काचे चलन करण्याच्या रांगेत थांबून नंतर अर्ज जमा करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना करावी लागत होती. ही प्रक्रिया विद्यार्थी, प्रशासनासाठी वेळखाऊ ठरत होती. त्यावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ही प्रक्रिया बदलण्यासाठी त्यात तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला. त्यात पहिल्यांदा सन २०२० मधील ५६ व्या दीक्षान्त समारंभासाठी अर्ज आणि पदवी प्रमाणपत्रासाठीचे शुल्क ऑनलाईन स्वीकारण्यात आले. त्यावेळी एक कोटी ५७ लाख इतकी शुल्काची रक्कम डिजिटल स्वरूपात विद्यापीठाने यशस्वीपणे स्वीकारली. त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षात संगणकीय प्रणालीमध्ये बदल करून ती अधिक विद्यार्थीभिमुख केली. त्यात विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी तक्रार निवारण व निपटारा करण्यासाठी स्वतंत्र सुविधा देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अर्ज भरण्यासाठी होणारा त्रास, कागदपत्रांचा अनावश्यक खर्च टाळण्यात आला. गेल्यावर्षी झालेल्या ६० व्या दीक्षान्त समारंभापासून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेली माहिती विद्यापीठातील डेटाबेसची पडताळणी करून विना कागदपत्र अर्ज स्वीकारण्यात आले. त्याचा चांगला उपयोग झाला. यंदाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभासाठी तर ५१ हजार विद्यार्थ्यांने अर्ज आणि तीन कोटी ३० लाख इतके शुल्क डिजिटल मोडमध्ये स्वीकारले आहे.

| विद्यापीठ स्थापनेपासून पदवी प्रमाणपत्र घेणारे विद्यार्थी | | |
|---|---|---|
| वर्ष | पदवी घेणारे एकूण विद्यार्थी | त्यातील विद्यार्थिनींची संख्या |
| १९६४ | १०९४ | १९९ |
| १९७४ | १००५९ | १६६३ |
| १९८४ | १२६२८ | ३२६८ |
| १९९४ | २४९३५ | ७८१७ |
| २०१८ | ५०४४४ | २६१३८ |
| २०२२ | ६२३६० | ३२५२० |
| २०२३ | ४९४३८ | २७४७५ |

> विद्यापीठाने माहिती-तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावीपणे वापर करून पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्याची प्रक्रिया अधिक सोयीस्कर केली आहे. त्यात विद्यापीठाच्या स्व-निर्मित संगणकप्रणालीचा उपयोग केला आहे. त्यामुळे वेळ, श्रम, आर्थिक बचत झाली आहे. प्रमाणपत्राच्या स्वरूपात आवश्यकतेनुसार बदल केले आहेत. यावर्षी ते द्विभाषिक केले असून, त्यात सिक्युरिटी फिचर वाढविली आहेत.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

### प्रमाणपत्राचा आकार बदलला, 'क्यूआरकोड' आला

■ विद्यापीठाकडून १९६४ पासून देण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र मोठ्या आकाराचे होते. त्यामुळे ते सांभाळणे अडचणीचे ठरत होते. त्यावर सन १९९७ मध्ये या प्रमाणपत्राचा आकार बदलण्याचा निर्णय झाला. त्यानुसार ४८ व्या दीक्षान्त समारंभापासून या प्रमाणपत्राचा आकार ए-फोर झाला. पुढे ५५ व्या समारंभापासून पदवीवर युनिक आयडेंटिफिकेशन नंबरचा समावेश झाला. त्यामुळे पदवीबाबतची संपूर्ण माहिती या एकाच नंबरद्वारे मिळणे सोपे झाले. ६० व्या समारंभापासून दूरशिक्षण विद्यार्थ्यांबाबतीत युजीसी रेग्युलेशननुसार अत्यावश्यक असलेल्या माहितीचा उल्लेख या प्रमाणपत्राच्या मागे करण्यात आला. आता यंदाच्या दीक्षान्त समारंभापासून या प्रमाणपत्रावर क्यूआर कोड, एबीसी आयडी, आधार कार्ड नंबर याचा समावेश केला आहे. त्याचा आईच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. एम्पॉवर्ड कॉलेजच्या विद्यार्थ्यांना संयुक्त मजकूर असणारे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या वर्षीच्या प्रमाणपत्राचे वैशिष्ट्य म्हणजे ते मराठी आणि इंग्रजी या द्विभाषेमध्ये असणार आहे.

### शिवदीक्षान्त प्रणालीची अन्य शैक्षणिक संस्थांतून मागणी

■ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी होणारा त्रास कमी करण्यासाठी दीक्षान्त विभागाचे तत्कालीन अधिकारी श्रीनिवास माने यांनी आयसीटीचा वापर केला. त्यातून विद्यापीठाने स्वतः शिवदीक्षान्त संगणक प्रणाली विकसित केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर घर बसल्या पदवी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची सोय उपलब्ध झाली आहे. शिवदीक्षान्त प्रणालीची मागणी अन्य शैक्षणिक संस्थांतून होत आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाने प्रशासकीय, परीक्षा विभागातील कामकाजाची गती, अचूकता वाढविण्यासाठी विद्यापीठनिर्मित संगणक प्रणाली तयार करण्याला पाठबळ दिले आहे. त्याचा चांगला परिणाम दीक्षान्त समारंभासह परीक्षा कामकाजामध्ये झाला असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे. या निमित्ताने आयोजित ग्रंथ महोत्सव या वर्षापासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार इमारत यामधील मोकळ्या प्रांगणात १६ व १७ जानेवारी दरम्यान दोन दिवस भरविण्यात येणार आहे.

विद्यापीठात भव्य दीक्षांत मंडपाची उभारणी करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी परीक्षा भवन परिसरातदेखील मंडप टाकून व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यापीठात पार्किंग व्यवस्थेसह रंगरंगोटीची कामे सुरू आहेत.

15 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ महोत्सवाची जागा यंदा बदलली

## विस्तार इमारत परिसरात दोन दिवस आयोजन

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणारा ग्रंथ महोत्सव या वर्षापासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार (अनेक्स) इमारत यामधील मोकळ्या प्रांगणात गुरुवारी (ता. १६) आणि शुक्रवारी (ता. १७) भरविण्यात येणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सव यंदा विस्तार इमारत परिसरात भरविण्यात येणार आहे.

दरवर्षी ग्रंथ महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आंबा बागेमध्ये भरविण्यात येत असे. मात्र, या महोत्सवासाठी होणाऱ्या गर्दीमुळे बागेमधील झाडांना इजा पोहोचू नये, यासाठी या वर्षीपासून तो विस्तार (अनेक्स) इमारतीच्या प्रांगणात भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार यंदाच्या महोत्सवाची जागा बदलली आहे. महोत्सवात नामवंत भारतीय तसेच विदेशी कंपन्यांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ वितरक सहभागी होणार आहेत. साधारणः ४० स्टॉल असतील. या महोत्सवानिमित्त गुरुवारी सकाळी साडेसात वाजता ग्रंथदिंडी आयोजित केली आहे. राजारामपुरीतील कमला महाविद्यालयापासून ग्रंथदिंडीला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपालखीच्या पूजनाने दिंडीचे उद्घाटन होईल. कमला महाविद्यालयापासून राजारामपुरीमार्गे आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठाचे गेट क्रमांक आठ आणि तेथून राजमाता जिजाऊ साहेब सभागृहातील दीक्षान्त सभा मंडपामध्ये आगमन आणि विसर्जन असा दिंडीचा मार्ग असेल. दिंडीनंतर सकाळी दहा वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. महोत्सव दोन दिवस सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याची अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली.

15 JAN 2025
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ महोत्सव यंदा विस्तार इमारत परिसरात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणारा ग्रंथ महोत्सव या वर्षापासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार (अनेक्स) इमारत यांमधील मोकळ्या प्रांगणात १६ व १७ जानेवारीला दोन दिवस भरविण्यात येणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक तथा ग्रंथ महोत्सव समन्वयक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली. दरवर्षी दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित करण्यात येणारा ग्रंथ महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आंबा बागेमध्ये भरविण्यात येत असे. तथापि, ग्रंथ महोत्सवासाठी होणाऱ्या गर्दीमुळे बागेमधील झाडांना इजा पोहोचू नये, यासाठी या वर्षीपासून तो विस्तार (अनेक्स) इमारतीच्या प्रांगणात भरविण्याचा निर्णय घेतला आहे. महोत्सवात नामवंत भारतीय तसेच विदेशी कंपन्यांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डिजिटल ग्रंथ वितरक सहभागी होणार आहेत. तात्पुरती उपाहारगृहेही तेथे असतील. महोत्सवात साधारण ४० स्टॉल असतील. ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने उद्या सकाळी ७:३० वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सव यंदा विस्तार इमारत परिसरात भरविण्यात येणार आहे. स्टॉल उभारणीचे काम सुरू आहे.

15 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा ग्रंथ महोत्सव 'ॲनेक्स' परिसरात

- कमला कॉलेजपासून होणार ग्रंथदिंडीला प्रारंभ
- दीक्षांत सभा मंडपात होणार ग्रंथदिंडीची सांगता
- दीक्षांत, ग्रंथ महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ महोत्सव यावर्षीपासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार (ॲनेक्स) इमारत यांमधील मोकळ्या प्रांगणात गुरूवारी १६ आणि शुक्रवारी १७ रोजी होणार आहे. या ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन गुरूवारी सकाळी १० वाजता होणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक तथा ग्रंथ महोत्सव समन्वयक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली.

दरवर्षी विद्यापीठाचा दीक्षांत ग्रंथ महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आंबा बागेमध्ये भरवण्यात येत होता. पण दीक्षांत समारंभ आणि ग्रंथ महोत्सवाला होणाऱ्या गर्दीमुळे बागेमधील झाडांना इजा पोहोचू नये, यासाठी यावर्षीपासून विस्तार (ॲनेक्स) इमारतीच्या प्रांगणात भरवण्याचा निर्णय घेतला आहे.

ग्रंथ महोत्सवात नामवंत भारतीय तसेच विदेशी कंपन्यांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजीटल ग्रंथ वितरक सहभागी होणार आहेत. येथे तात्पुरती उपाहारगृहेही असणार आहेत. या महोत्सवात साधारण ४० स्टॉल असणार आहेत. ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने गुरूवारी, १६ रोजी सकाळी ७.३० वाजता कमला महाविद्यालयापासून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ग्रंथ पालखीच्या पूजनाने दिंडीचे उद्घाटन होणार आहे. ही ग्रंथदिंडी कमला महाविद्यालयापासून राजारामपुरीमार्गे आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठाचे गेट क्र. ८ आणि तेथून राजमाता जिजाऊ साहेब सभागृहातील दीक्षांत सभा मंडपामध्ये येणार आहे. तेथे या ग्रंथदिंडीची सांगता होणार आहे. ग्रंथमहोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली.

दरम्यान, गुरूवारी सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि संत तुकाराम अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'तुकोबांची अभंगवाणी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या ग्रंथमहोत्सवात सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी रहावे, असे आवाहन डॉ. सुतार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2025
सकाळ

# 'रंग-संगीत' कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये 'रंग-संगीत : प्रस्तावना व परिचय' ही नाट्य व संगीतविषयक दोनदिवसीय कार्यशाळा डॉ. साईश देशपांडे (गोवा) यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात देशपांडे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. अभिनय करत असताना नाटकामध्ये संगीताचा वापर कसा करावा, संगीताचे महत्त्व, शारीरिक हालचालीतून, संवादातून संगीत कसे निर्माण होते, पार्श्वसंगीताचा आधार कसा घ्यावा, स्वर, आवाजाची पट्टी, लय, ताल या मूलभूत सांगीतिक घटकांनुसार संवादाचे सादरीकरण, उच्चारण कसे असावे, इत्यादी घटकांच्या अनुषंगाने डॉ. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. रविदर्शन कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील डॉ. संजय तोडकर दिग्दर्शित 'भाऊबंदकी' नाटकातील यशस्वी विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात 'रंग-संगीत' कार्यशाळेत विद्यार्थ्यांकडून नाट्य प्रात्यक्षिके करवून घेताना डॉ. साईश देशपांडे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2025
तरुण भारत

# 'राष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषेला पर्याय नाही'

**कोल्हापूर :** 'आम्ही भारताचे लोक" उक्तिप्रमाणे प्रत्येकाने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन देशासाठी निस्वार्थ सेवा केली पाहीजे. आपत्ती व्यवस्थापनासाठी देशाच्या कानाकोप्रयात जावे लागते, त्यावेळी हिंदी भाषेचाच आधार घ्यावा लागतो, असे प्रतिपादन व्हाईट आर्मीचे अध्यक्ष अशोक रोकडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे हिंदी व पर्यावरण शास्त्र अधिविभाग, शिव सहाय्यता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि यूको बँक यांच्या वतीने आयेजित जागतिक हिंदी दिनानिमित्त व्याख्यान व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. दुसऱ्या सत्रात डॉ. पल्लवी कुलकर्णी, डॉ. प्रदीप भिंगार्डे, डॉ. विनायक माळी यांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे समन्वय डॉ. एस. एम. गायकवाड, राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठ यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष कोळेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. गीता दोडमणी, डॉ. अक्षय भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आसावरी जाधव यांनी आभार मानले. यावेळी विशाल गीते, वारणा महाविद्यालयाचे डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, अधिसभा सदस्य अभिषेक मिठारी, डॉ. पल्लवी भोसले, प्रा. अनिल मकर, डॉ. रचना इंगवले, डॉ. सुषमा चौगले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रकाश मुंज यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले.